Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 07 April 2025

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

प्रादेशिक बातम्या

दिनांक ०७ एप्रिल २०२५ दुपारी १.०० वा.

****

जागतिक आरोग्य दिवस आज साजरा होत आहे. सर्वांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात आणि आरोग्य विषयक जनजागृती व्हावी या उद्देशानं, हा दिवस साजरा केला जातो. 'निरोगी सुरुवात, आशादायक भविष्य' ही यंदाच्या जागतिक आरोग्य दिनाची संकल्पना आहे. माता आणि नवजात बालकांच्या आरोग्यावर लक्ष केंद्रित करणं हा या संकल्पनेमागचा हेतू आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यानिमित्त निरोगी जग निर्माण करण्याच्या आपल्या वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला. चांगलं आरोग्य हा प्रत्येक समृद्ध समाजाचा पाया असल्याचं त्यांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात सांगितलं. सरकार आरोग्यसेवेवर लक्ष केंद्रीत करत राहील, आणि लोक कल्याणासाठी काम करत राहील, असं पंतप्रधानांनी नमूद केलं.

****

जागतिक आरोग्य दिनाच्या अनुषंगानं, भुवनेश्वरच्या कलिंगा स्टेडियम इथं केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या उपस्थितीत सामाईक योगाभ्यास प्रात्यक्षिकं करण्यात आली. या कार्यक्रमात योग दिन २०२५ ची उलटमोजणी सुरु झाली. आतापर्यंत २४ कोटींहून अधिक लोकांनी आंतरराष्ट्रीय योग दिनात थेट सहभाग घेतला आहे. दरवर्षी सहभागींची संख्या वाढत आहे आणि नवीन विक्रम तयार केले जात आहेत. या वर्षीही सहभागाच्या बाबतीत नवा विक्रम प्रस्थापित होईल अशी आशा आयुष मंत्रालयानं व्यक्त केली.

****

जागतिक आरोग्य दिनानिमित्त आज महाराष्ट्र आरोग्य सन्मान सोहळा – २०२५ आणि विविध आरोग्य सेवा योजनांचा शुभारंभ मुंबईतल्या यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्या मुख्य

उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. ई सुश्रृत संकेतस्थळाच्या विस्तारीकरणाचा शुभारंभ, महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी प्रणालीच्या ऑनलाईन प्रमाणपत्र वितरणाचा शुभारंभ, राज्यातल्या सहा जिल्ह्यांत सहा आरोग्य संस्थांमध्ये डायलिसीस युनिटचा शुभारंभ, राज्यातल्या आरोग्य संस्थांच्या बांधकामाच्या ऑनलाईन संनियंत्रण आणि पाठपुरावा सॉफ्टवेअरचं उद्घाटन यासह अनेक अनेक योजना आणि उपक्रमांचा यात समावेश आहे. यावेळी आरोग्य सेवा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांचा महाराष्ट्र आरोग्य सन्मान आणि पारितोषिक देऊन गौरव करण्यात येणार आहे.

****

प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत आतापर्यंत ३२ लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची ५२ कोटींहून अधिक कर्जे मंजूर करण्यात आली आहेत. आर्थिक समावेशन सुलभ करणं आणि उद्योजकांना सक्षम बनवणं या उद्देशाने बिगर-कॉर्पोरेट, बिगर-कृषी लघु आणि सूक्ष्म उद्योगांना १० लाख रुपयांपर्यंतचं तारणमुक्त कर्ज देण्यासाठी ही योजना २०१५ मध्ये सुरू करण्यात आली. मुद्रा कर्जांपैकी जवळजवळ ७० टक्के कर्ज महिला उद्योजकांनी घेतले आहे.

****

केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान आज नंदुरबारच्या दौऱ्यावर आहेत. नंदुरबारमध्ये कृषी विज्ञान केंद्रामध्ये आयोजित कार्यक्रमात ते सहभागी होत आहेत. यानंतर कृषी मंत्री ज्ञान विज्ञान मंडपम, शेतकरी ज्ञान संवर्धन तसंच महिला तंत्रज्ञान पार्कचं देखील उद्घाटन त्यांच्या हस्ते होईल.

****

मुंबई पोलिसांच्या सायबर लॅबचं उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झालं. डिजिटल अशिक्षितांना शिक्षित करणं गरजेचं असल्याचं ते यावेळी म्हणाले. तीन नवीन फौजदारी कायद्यांबाबतही मुख्यमंत्र्यांनी माहिती दिली.

****

सामाजिक न्याय विभागानं सुरु केलेल्या मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यातले ८०० लाभार्थी भाविक अयोध्या दर्शनासाठी रवाना झाले. माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी हिरवा झेंडा दाखवून ही रेल्वे रवाना केली. दानवे यांनी या भाविकांशी संवाद साधून त्यांना यात्रेसाठी शुभेच्छा दिल्या. सामाजिक न्याय विभागानं राज्यातल्या ६० वर्ष किंवा त्याहून अधिक वय असलेल्या ज्येष्ठ नागरिकांना भारतातल्या तीर्थक्षेत्रांना भेटी देण्यासाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरु केली आहे.

****

लातूर महानगरपालिकेचे आयुक्त बाबासाहेब मनोहरे शुद्धीवर आले असून, त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत आहे. मात्र उजव्या मेंदूवर गोळीची जबर जखम झाल्याने त्यांच्या डाव्या बाजूला अर्धांगवायू झाला असल्याची माहिती लातूरच्या सह्याद्री हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी दिली आहे. मनोहरे यांना पुढील उपचारासाठी मुंबईच्या कोकिलाबेन रुग्णालयात हवाई रुग्णवाहिकेने नेलं जात आहे. मनोहरे यांनी परवा रात्री डोक्यात गोळी झाडून आत्महत्येचा प्रयत्न केला होता.

****

विश्वविजेता रुद्रांक्ष पाटील यानं ब्युनोस आयर्स इथं सुरू असलेल्या आय एस एस एफ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत दहा मीटर एअर रायफलमध्ये पुरुषांच्या गटात सुवर्ण पदक पटकावलं. भारताचं या स्पर्धेतील हे दुसरं सुवर्ण पदक असून, या स्पर्धेत भारताच्या खात्यात आतापर्यंत चार पदकं जमा झाली आहेत. महाराष्ट्राच्या रुद्रांशने अंतिम फेरीत २५२ पूर्णांक नऊ गुणांचा वेध घेतला. विश्वचषक स्पर्धेतलं हे त्याचं दुसरं वैयक्तिक सुवर्णपदक आहे.

****

हवामान

येत्या ३-४ दिवसात महाराष्ट्र, वायव्य भारत, मध्य भारत आणि दक्षिण द्वीपकल्पात कमाल तापमानात दोन ते चार अंश सेल्सिअस वाढ होण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. गुजरात, राजस्थान, हरियाणा, चंदीगढ, दिल्ली आणि पंजाबमधे पुढचे चार-पाच दिवस उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे. पूर्व भारतात येत्या दहा तारखेपर्यंत विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

****